म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. ४५४२.

# राम...रहीम


BVBK-0404542

बा. गो. नार्वेकर



म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वा. नं.

प्र. भिकाजी टवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई



खूप वाचा
खूप शिका

...११...

# राम..रहीम

बा. गो. नाईक

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. नों. दि
कि.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

BVBK-0404542

मूल्य सहा आणे

## पात्रें

रघुवीर

प्रभाकर

गिरिधर

बन्सी

रहीम

महंमद

हुकुमशेठ

## नाट्य-घटनेचा काल

डिसेंबर १९४७ ते फेब्रुवारी १९४८

---


चित्रकार

वि. ना. गोलिवडेकर

ब्लॉक्स

कर्नाटक प्रोसेस स्टूडियो

मुद्रक

बा. ग. ढवळे,

कर्नाटक मुद्रणालय,

चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक

केशव भिकाजी ढवळे,

कर्नाटक हाउस,

चिराबाजार, मुंबई २

पहिली आवृत्ति : १९५४



सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रमांक १५००९
विभाग ना-५
क्रमांक ६३६
नोंद दि. ८/१२/७५
ग्रंथालय शाखा

## प्रास्ताविक –

प्रत्येक काळ्याकुट्ट ढगाला चंदेरी किनार असते, प्रत्येक दुर्दैवी घटनेंतून मानव्याचे अमृतबिंदु पाहावयास सांपडतात. १९४७–४८ सालांतील हिंदु-मुसलमानांच्या दंगलीच्या दुःखदायक घटनांमधूनही माणुसकीचा ध्वज उंच राखणाऱ्या व्यक्ति दिसून येत होत्या. त्यांच्या आकृति फिक्या असल्या तरी त्या प्रभावी होत्या. त्या वेळीं मनांत घोळत असलेले विचार ह्या छोट्या नाटिकेच्या रूपानें पुढें ठेवीत आहें. प्रस्तुत नाटिकेंतील सर्व पात्रें आणि प्रसंग काल्पनिक आहेत. कथासूत्र सर्वस्वी काल्पनिक आणि स्वतंत्र असून कोणत्याही प्रत्यक्ष घटनेचा बुद्धिपुरस्सर निर्देश करण्याच लेखकाचा उद्देश नाहीं.

बा. गो. नाईक

शिवाजीनगर,
सांगली, चैत्र शुद्ध प्रतिपदा,
शक १८७६

# १

१९४७ च्या डिसेंबरचा काळ.

हिंदुमुसलमानांच्या वैमनस्यामुळें देशांतील वातावरण तंग होऊन गेलें आहे. ह्या द्वेषाच्या गढूळ वातावरणांतही प्रीतीचा संदेश देणारे गोड सूर कोठें कोठें कानांवर येत होते.

अशा वेळीं एका शहरांत ...

**सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ताँ हमारा,**
**हम बुलबुले हैं उसकी वह गुलसिताँ हमारा,**

**गुरबतमे हो अगर हम रहता है दिल वतनमें,**
**समजो वहीं हमें भी दिल हो जहाँ हमारा ।**

**अय आबरूदे गंगा वह दिन है याद तुझको**
**उतरा तेरे किनारे जब काँरवाँ हमारा ?**

**मजहब नहीं सिखाता आपसमें बैर रखना**
**हिंदी है हम वतन है हिंदोस्ताँ हमारा !**

( पडदा उघडतो )

**रघुवीर :** ( प्रवेश करून ) कोण म्हणतो आहे हें गाणं ? बंद करा असल्या वडबडी. म्हणे आम्ही हिंदी आहोंत ! वैर करायला नको ! हिंदुमुसलमान ह्यांचं सख्य ? छे, छे, ही गोष्ट अशक्य आहे. भारतमातेच्या कोट्यवधि पुत्रांना ज्यांनीं निर्वासित केलं त्यांच्याशीं ह्यापुढें ऐक्य नाहीं. हा पाहा, असंख्य निर्वासितांचा लोंढा रस्त्यावरून निघाला आहे. काय ही ह्यांची दैन्यावस्था ! देवा, देवा, कुठें जातील हे लोक ? कुठें बरं राहातील हे ? कोण त्यांचा वाली ?

**प्रभाकर :** ( दुसऱ्या बाजूनें प्रवेश करून ) त्या तुझ्या गांधींना बोलाव. दाखव, दाखव हें दृश्य त्यांना. म्हणे हिंदुमुसलमान भाई भाई ! म्हणे एका आईचीं मुलं, ह्या भारतमातेचीं मुलं ! आपल्या आईचीं खांडोळीं करायला तयार होणारीं हीं मुलं कसलीं ? आणि त्या आईचे तुकडे करायला सम्मति देणारे हे आमचे पुढारी तरी कसले ?

**रघुवीर :** अरे, प्रभाकर, पुढाऱ्यांचा काय दोष त्यांत ? महात्माजीं-सारख्या निर्मळ अंतःकरणाच्या थोर माणसाला हे राजकारणी कुटिल डाव समजले नाहींत, तर त्यांचा काय बरं दोष त्यांत ?

**प्रभाकर :** अरे, त्यांचाच तर हा सारा दोष आहे. ह्या पापाचं खरं खापर, रघू, त्यांच्याच डोक्यावर फोडायला पाहिजे. काय म्हणे नौखालींत पायीं दौरा काढला ! अशा दौऱ्यांनीं हिंदुमुसलमानांचीं मनं जुळलीं असतीं तर नुसता इकडून तिकडे प्रवास करून रामराज्य निर्माण करतां आलं असतं ! अरे, जशास तसं आणि ठोशास ठोसा असंच आतां एकमेकाशीं वागलं पाहिजे. शत्रूलाही प्रेमानें वागविण्याच्या महात्मा गांधींच्या ह्या खुळेपणाचा आणि आमच्या पुढाऱ्यांच्या भित्रेपणाचा मला आतां मनस्वी संताप आला आहे.



रघुवीर



प्रभाकर

**रघुवीर :** प्रभाकर, तुझं म्हणणं केव्हां केव्हां खरं वाटूं लागतं. ही ह्या निर्वासितांची भयानक परिस्थिति पाहिली कीं मन संतापानें जळूं लागतं. पण कांहींच उपाय सुचत नाहीं. ह्या दुर्दैवी घटनेवर कांहींच उपाय नाहीं का रे प्रभाकर ?

**प्रभाकर :** उपाय ! मित्रा रघुवीर, माझ्या मतें एकच उपाय आहे ही दुःखदायक परिस्थिति थांबवायला. जसं मुसलमानांनीं पाकिस्तानांतून हिंदूंना हाकून देऊन आमच्या आयावहिणींना निर्वासित केलं तसं आपणही ह्या भारतांतून मुसलमानांना हाकून देऊन त्यांना निर्वासित केलं पाहिजे. त्यांचीं इथलीं घरं आणि मालमत्ता ह्या निर्वासित हिंदूंना दिलीं पाहिजेत.

( पडद्यांत ... " भाई मुझे बचावो ! मेरे बालबच्चेको जीने दो ! ...... भाई ... )

**प्रभाकर :** अरे, हा कुणी निर्वासित इकडेच येत आहे.

[ गिरिधर आणि त्याचा छोटा मुलगा प्रवेश करतात. गिरिधरच्या अंगावर फाटके कपडे आहेत. धुळीनें शरीर मलीन झालेलें. उदासीन पण खुनशी चेहरा.

**गिरिधर :** भाई, ही पाहा माझी अवस्था. स्वराज्य मिळून चार महिने झाले, पण चार महिन्यांत आमच्यासारखे लाखो लोक देशोधडीला लागले !

**रघुवीर :** अरे, अरे, भाई, काय ही तुमची अवस्था ! या बसा इकडं. तुमची हकीकत तरी सांगा. आम्ही तुम्हांला काय मदत करावी हें सांगाल का ? आमचा प्राण पणाला लावून आम्ही तुम्हांला मदत करूं.

**गिरिधर :** प्राण पणाला लावायच्या कशाला गोष्टी बोलतां ? तुम्ही इकडे सुखांत ; आम्हांला निर्वासित करणाऱ्या त्या पाकिस्तानी मुसलमानांचे



गिरिधर



बन्सी

भाईबंद इकडे सुखांत ! आम्ही तुमचेच बांधव .... आम्ही मात्र देशोधडीला लागलों ! आमचीं बायका-पोरं तिकडे पाकिस्तानांत ठार झालीं. आमचीं घरंदारं मातीला मिळालीं. अन्नासाठीं आम्ही महाग झालों आणि इकडं तुम्ही नुसत्या प्राण पणाला लावायच्या पोकळ गोष्टी बोलतां !

**प्रभाकर :** छे, छे, भाई, आम्ही नुसत्या पोकळ गोष्टी बोलणारे नाहीं. हिंदूंचा दरारा स्थापन करणाऱ्या शिवाजीचे आणि पराक्रमी पेशव्यांचे आम्ही वंशज आहोंत ! तुमची हकीकत तरी सांगा. आम्ही तुम्हांला कृतीनें मदत करूं. तुमच्या हालअपेष्टांचा आणि अन्यायाचा कृतीनें बदला घेऊं.

**गिरिधर :** शाबास बेटा — शाबास ! तूं कांहीं करशील असं वाटतं मला. ऐक, ऐक माझी करुण कहाणी. मी मूळचा इकडचा वऱ्हाडांतला. जातीनें परदेशी रजपूत. मी डाक्याला गेलीं दहा वर्षं नोकरीसाठीं राहातों. माझं नांव गिरिधर आणि हा माझा मुलगा बन्सी ....

**बन्सी :** आणि महंमद म्हणून माझा एक मित्र होता. कित्ती कित्ती चांगला होता तो !

**गिरिधर :** ( रागानें बन्सीकडे पाहात ) अरे असेल चांगला. मुसलमान एखाद दुसराच चांगला ! तूं मध्यें बोलूं नकोस.

**प्रभाकर :** गिरिधर, तुम्ही सांगा आपली हकीकत.

**गिरिधर :** ऐका, नीट ऐका. मी राहात होतों त्याच्या आसपास मुसलमानांची वस्ती होती. एक महिना झाला असेल त्या गोष्टीला. बंगालमध्यें ठिकठिकणीं हिंदुमुसलमानांच्या दंगलीला सुरुवात झाली आणि त्या हकीकती

कानांवर येऊं लागल्याबरोबर डाक्यांत राहाणाऱ्या आम्हा हिंदू लोकांची पळापळ सुरू झाली. आम्ही ज्या घरांत राहात होतों त्या घरावर गुंडांनीं हल्ला केला आणि त्या हल्ल्यांत ....

**बन्सी :** आम्हांला महंमदच्या बाबानें वाचविलं !

**गिरिधर :** ( रागानें ) असेल, वांचवलं असेल ! पण सगळेच मुसलमान काय महंमदच्या बाबासारखे असतात काय ? पोरा, तुला सांगितलं ना, मध्यें मध्यें बोलूं नको म्हणून ?

**प्रभाकर :** बरं, पुढें काय झालं ?

**गिरिधर :** पुढें आम्ही सगळं घरदार टाकून, जीव घेऊन जे तिथून पळालों तें कसंबसं रेल्वे स्टेशन गांठलं. गाडीला पैसे नव्हते, खायला अन्न नव्हतं, माझ्या आणि बन्सीच्या अंगावर घालायला कपडे नव्हते ....

**बन्सी :** पण बाबा, त्या स्टेशनजवळ राहाणाऱ्या त्या मुसलमान व्यापाऱ्यानें आणि त्याच्या बायकोनें आपल्याला जेवायला घातलं, त्याच्या बायकोनें मला नवे कपडे दिले आणि ....

**गिरिधर :** ( रागानें बन्सीच्या अंगावर हात उगारून ) गाढवा, आणि त्यानें प्रवासाला पैसे दिले ! म्हणून काय झालं ? सगळेच मुसलमान असे उदार असतात होय ? तुला सांगितलं ना कीं तूं चूप राहा म्हणून. आतां पुन्हा बोल कीं देतों ....

**रघुवीर :** गिरिधर, तुम्ही सांगा पुढें. बन्सी, पोरा, तूं मध्यें मध्यें गिरिधरला अडवूं नकोस. सांगा हो, सांगा तुम्ही पुढें काय झालं तें. आम्हांला ह्या पोराचं काय खरं वाटणार आहे काय ? तुम्ही सांगा पुढें.

**गिरिधर :** आम्ही जेव्हां गाडींत बसलों, तेव्हां त्या गाडींत असंख्य निर्वासितांचा लोंढा आमच्याबरोबर होता. त्यांपैकीं कुणाचा हात तुटलेला, कुणाचा पाय तुटलेला ! कुणाचा भाऊ ठार झालेला, तर कुणाचा काका कुणाचा मामा बेपत्ता ! कुणाचीं घरं लुटलेलीं तर कोणाच्या बायका कुणाच्या मुली पळविलेल्या ....

**बन्सी :** पण बाबा, आपल्या मालनकाकीला कसं हो त्या मुसलमान तरुणांनीं सोडवून आणलं आणि नागपूरला सुखरूप पोहचतं केलं ?

**गिरिधर :** ( दांतओठ खात रागानें ) कार्ट्या, लागली का तुझी जीभ वळवळ करायला ! अरे, सगळेच मुसलमान काय असे असतात होय ? गाडींत तो गोकुळ सांगत नव्हता का कीं त्याच्या आळींतल्या सगळ्या बायकांना मुसलमानांनीं पळवलं, सगळ्या पुरुषांच्या कत्तली केल्या ! मांसाचा चिखल आणि रक्ताचा पूर सोडला मुसलमानांनीं ! आणि त्या रक्ताच्या पुरांत लहान लहान कोवळ्या मुलांचीं मुंडकीं कापून ....

**रघुवीर :** काय हा भयंकर प्रकार !

**प्रभाकर :** काय ? लहान मुलांची कत्तल ?

**गिरिधर :** होय, होय, लहान मुलांची निर्दय कत्तल ! तुम्हांला सांगून खरं वाटणार नाहीं, पण अक्षरशः कत्तली झाल्या कत्तली ! दोन महिन्यांचं मूलसुद्धा जिवंत सोडलं नाहीं त्या नरराक्षसांनीं ! आम्ही घरादाराला— सर्वस्वाला मुकलों ! आमची अशी कठिण अवस्था झाली ! ( रडूं लागतो )

**प्रभाकर :** भाई गिरिधर, तुम्ही शोक करूं नका. तुम्ही आपलं दुःख आवरा. आम्ही तुमची व्यवस्था करतों.

**रघुवीर :** ह्या विचाऱ्याची आपण कुठें तरी राहाण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**प्रभाकर :** दुसरीकडं कुठें कशाला? तें पाहा, पलीकडं तें नवीन घर दिसतं आहे, त्यांत ....

**रघुवीर :** त्यांत! रहीम .... आपला रहीम — ऐक्यमंदिराचा चालक रहीम राहातो ना?

**प्रभाकर :** होय रहीम! पण तो आतां आपला रहीम नव्हे. आतां रहीमची दोस्ती आणि ऐक्यमंदिराची उठाठेव बस्स झाली! रघुवीर, हिंदुमुसलमानांच्या एकीचा बकवा आतां पुरे झाला! रहीमच्या जातिबांधवांनीं आमच्या गिरिधरला आणि त्याच्यासारख्या दुसऱ्या असंख्य बांधवांना निर्वासित केलं आहे. आतां आम्हीं त्याला निर्वासित केलं तर बिघडलं कुठें? भाई गिरिधर, चल ....

**गिरिधर :** चलो भाई, मुझे यही मकान दे दो.

**प्रभाकर :** चल रघुवीर, हीच खरी कृतीची आणि कसोटीची वेळ आहे. [ जातात.

प ड दा

# २

रहीमचें घर. साधी पण टापटिपीची राहाणी.

जवळ महात्मा गांधींचा फोटो आहे.
खादीच्या शुभ्र पोषाखांत रहीम खालीं बसला आहे. जवळच एक चरखा आहे.
रहीमचा चेहेरा शांत आणि प्रसन्न दिसत आहे.
रहीमचा पुतण्या महंमद जवळच एक पुस्तक पाहात बसला आहे.

**रहीम :** बेटा महंमद, तूं आणि बाबा डाक्याहून कलकत्त्याला आलां तरी कधीं ? कलकत्त्याची हालहवाल ऐकून मी फार कष्टी झालों आहें. तूं आलास त्या वेळीं तुला त्रास तर झाला नाहीं ना ?

**महंमद :** काका, मला त्रास झाला थोडा, पण एका हिंदू बाईनें मला फार प्रेमानें वागवलं, आपल्या मुलासारखं मला तिनें सांभाळलं आणि तिच्या नवऱ्यानें स्वतः तिकीट काढून मला इकडं सुखरूप पाठवून दिलं. बाबाही सुखरूप असले पाहिजेत. ते भेटतील लवकरच आपल्याला.

**रहीम :** महंमद, बेटा, सगळेच लोक कांहीं दुष्ट माथेफिरू असत नाहींत. गांधीबाबाच्या ह्या महान् देशांत आम्ही एकमेकाशीं प्रेमानें



महंमद



रहीम

वागलों तर हा देश आम्ही लवकरच वैभवशाली करून टाकूं. बेटा, तुला माहीत आहे ....

**परबत वह सबसे ऊँचा हमसाया आसमाँका !**
**वह संतरी हमारा, वह पासबाँ हमारा !**
**गोदीमें खेलती हैं उसकी हजारों नदियाँ,**
**गुलशन है जिनके दमसे रश्के-जिनाँ हमारा !**

महंमद, इक्बालचं हें आमच्या देशाचं गौरव-गीत माहीत आहे तुला ? काय कमी आहे आमच्या ह्या देशांत ? पण प्रेम — प्रेम .... परस्परांत, हिंदुमुसलमानांत प्रेम ही एकच गोष्ट आज कमी होत चालली आहे.

**महंमद :** काका, इक्बालचं हें गाणं आम्ही कित्येक वेळां शाळेंत म्हणत होतों. हिंदुमुसलमान सगळे आम्ही प्रेमानें एके ठिकाणीं येत होतों, गाणीं म्हणत होतों. पण कांहीं गुंडांनीं दंगा करायला .... भांडणं लावायला सुरुवात केली. आमच्याकडं हिंदुमुसलमानांत भांडणं नव्हतीं हो. माझा बन्सी म्हणून एक मित्र होता. तो कित्ती चांगला होता. पण आतां कुठें असेल बिचारा !

**रहीम :** काय ह्या लोकांना म्हणावं ! अरे, तुम्ही माणसांसारखीं माणसं असून अशी पशूसारखी करणी कां करतां ? ह्या आपल्या भांडणानें आम्ही कायमचे दुसऱ्याचे गुलाम म्हणून राहूं हें कसं समजत नाहीं ह्यांना ?

**महंमद :** हिंदुमुसलमानांची ही दंगल पाहून मला फार दुःख होतं काका.

**रहीम :** हीं आमच्यांतलीं भांडणं आमचे शत्रु निर्माण करीत आहेत. ज्यांना हिंदूंना आणि मुसलमानांना — दोघांनाही गुलामींत कायमचं जखडून ठेवायचं आहे, त्या आमच्या शत्रूंच्या कारवाया आहेत ह्या !

**महंमद :** काका, खरं आहे तुमचं म्हणणं. आम्हीसुद्धा तिकडं कधींच भांडत नव्हतों ....

**प्रभाकर :** ( प्रवेश करून ) पण आज आमचा प्रश्न भांडणानेंच मिटविणार आम्ही. रहीम, चल ऊठ, हें घर अगोदर रिकामं कर ....

[ मागोमाग रघुवीर, गिरिधर, बन्सी प्रवेश करतात.

**बन्सी :** अरे महंमद, तूं इकडे कुठें ?

**महंमद :** बन्सी ! माझा बन्सी ! ( दोघे एकमेकांस मिठ्या मारतात. )

**गिरिधर :** बन्सी, कार्ट्या, दूर हो. हट बाजूला. इथें सुद्धा ह्या महंमदनें पाठ धरली आमची ! ( त्याला ओढतो )

**रहीम :** अरे प्रभाकर, अरे रघुवीर, असे रागानें कां बोलतां ? अरे, असं रागानें कां पाहातां माझ्याकडं ? रघुवीर, आणि हे कोण ?

**रघुवीर :** हीं पूर्व बंगालमधून आलेलीं माणसं आहेत.

**प्रभाकर :** तुमच्या जातभाईच्या पापांचीं फळं हीं ! ज्यांना, रहीम, तुझ्या जातभाईनीं निर्वासित केलं ते हे हिंदु निर्वासित आहेत !

**रहीम :** काय ? निर्वासित ? मग त्यांना राहूं दे इथें. मी त्यांना माझ्या घरांत—ह्या ऐक्यमंदिरांत आश्रय देतों. मी ह्यांची व्यवस्था करतों.

**बन्सी :** बाबा, आपण ह्यांच्याबरोबर इथेंच राहूं या कीं हो ? ह्या महंमद-बरोबर इथेंच राहूं या ना ?

**प्रभाकर :** नाहीं, नाहीं, रहीम. त्या ऐक्यमंदिराची पाटी आतां बाहेर दूर फेकून दे. तूं ह्यांना .... गिरिधर आणि बन्सी ह्यांना तुझं घर रिकामं करून दिलं पाहिजेस. तूं ह्यापुढें ह्या घरांत राहूं नयेस असं ठरवलं आहे आम्हीं.

**रहीम :** प्रभाकर, मीं असा काय अपराध केला आहे तुमचा म्हणून तुम्ही माझ्यावर हा जुलूम करतां आहांत ? ह्या ऐक्यमंदिरांत हिंदु आणि मुसलमान एकत्र राहूंच शकणार नाहींत का ? माझ्या घरांतून तुम्ही मला बाहेर जायला सांगतां, मी असा काय अपराध केला आहे तुमचा ?

**गिरिधर :** तूं नसलास तरी तुझ्या जातभाईंनीं केला आहे.

**प्रभाकर :** होय, गिरिधर म्हणतो तें खरं आहे. आपल्या जातभाईंच्या अपराधाबद्दल प्रत्येकानें शासन भोगलं पाहिजे. चल, नीघ बाहेर ....

**रहीम :** आपल्या जातभाईंच्या अपराधाबद्दल प्रत्येकानें शासन भोगलं पाहिजे ! हं ! प्रभाकर, असा प्रसंग तुझ्यावर आला आणि तुला असं कुणीं म्हटलं तर ....

**प्रभाकर :** तर माझं मी पाहून घेईन. तुला नको त्याची काळजी. पण ह्या घटकेला अन्यायाचा बदला आम्ही सूडानें घेणार !

**रहीम :** प्रभाकर, रघुवीर, अरे ही भाषा आपल्याला शोभत नाहीं. भांडणानें भांडण आणि वैरानें वैर वाढत जातं. ह्याचसाठीं आपल्या थोर पुढाऱ्यानें .... महात्माजीनें आपल्याला ऐक्याचा आणि प्रेमाचा संदेश दिला आहे ना ? ह्या ध्येयानेंच आपण हें ऐक्यमंदिर स्थापन केलं आहे ना ?

**प्रभाकर :** कशाला घेतोस महात्मा गांधींचं नांव ! त्यांनींच तर तुम्हां मुसलमानांना चढवून ठेवलं आणि ....

**गिरिधर :** आतां तुम्हीं शिरजोर होऊन आम्हांला निर्वासित केलं आहे !

**रघुवीर :** पण गिरिधर, तूं रहीमबरोबर इथें राहिलास तर काय बिघडेल ?

**बन्सी :** बाबा, आपण ह्यांच्याबरोबर राहूं या कीं हो.

**गिरिधर :** चल, पोरट्या, आतां ह्या लोकांच्याबरोबर राहायचं नाहीं असं ठाम ठरवलं आहे मीं. आमच्या बायकापोरांची कत्तल करणाऱ्या मुसलमानांच्या संगतींत मी राहूं ? राहीन तर मी एकटाच राहीन .... नाहींतर .... चल, चल .... बन्सी इथून. काय हो प्रभाकर, रघुवीर, तुम्ही माझी व्यवस्था लावणार कीं जाऊं मी ? चल, बेटा बन्सी, चल. ह्या नेभळटांच्या नादीं लागून उगीच इथपर्यंत आलों मी. चल ....

**रघुवीर :** थांबा, थांबा, गिरिधर जाऊं नको. आम्ही कांहींतरी व्यवस्था करतों तुझी.

**प्रभाकर :** आम्ही हातांत बांगड्या भरल्या आहेत काय गिरिधर ? हें पाहा, रहीम, तूं मुकाट्यानें ह्या क्षणीं हें घर रिकामं करून ह्या गिरिधरला दे. जर आढेवेढे घेतलेस किंवा सरकारांत तक्रार केलीस तर याद राख— तुला आणि इथल्या सगळ्या मुसलमानांना इथून निर्वासित व्हावं लागेल !

**महंमद :** कां हो असं बोलतां ? बन्सी आणि मी किती प्रेमानें एकामेकां शेजारीं राहात होतों कीं ....

**रहीम :** मित्रा, प्रभाकर, तोच का तूं प्रभाकर कीं ज्यानें सत्याच्या रक्षणाकरतां आपल्या वडिलांचीही पर्वा केली नाहीं? देशकार्यासाठीं आपल्या घरादारावर ज्यानें पाणी सोडलं तोच का तूं प्रभाकर? हिंदुमुसलमानांच्या ऐक्याशिवाय ह्या देशाचं कल्याण होणार नाहीं अशी खात्री पटल्यामुळें ज्यानें ऐक्यमंदिर स्थापन करण्यांत पुढाकार घेतला तोच का तूं प्रभाकर?

**प्रभाकर :** होय, तोच मी प्रभाकर! पण आज ह्या निर्वासितांना पाहून आणि त्यांची भयानक हकीकत ऐकून माझीं मतं बदललीं आहेत. निधर्मी राज्य ह्या कल्पना फसव्या आहेत. आम्ही आतां फक्त हिंदूंचंच राज्य इथें स्थापन करणार!

**रहीम :** ठीक. प्रभाकर, तुझ्या विचाराप्रमाणें वागण्याची तुला मोकळीक आहे. मी हें घर तुला ह्या क्षणीं मोकळं करून देतों. पण तें भीतीनें नव्हे. अल्ला मला कुठेंही सुखानें ठेवील. तुम्हांला सर्वांना त्यानें तसंच सुखी ठेवावं अशी माझी इच्छा आहे. चल, महंमद, चल.

**बन्सी :** महंमद, जरा थांब, मीही येऊं तुझ्याबरोबर? येऊं?

**रहीम :** नको बाळ, तूं नको ह्या दुर्दैवी रहीमबरोबर येऊंस. मी माझ्या शेतावर जाईन. तिथें झोपडी बांधून राहीन मी. प्रभाकर, रघुवीर, घ्या हें घर ताब्यांत. हें ऐक्यमंदिर मी तुमच्या स्वाधीन करतों. इथें गिरिधर, बन्सीधर खुशाल राहूं देत. मी सरकारांत बिलकुल तक्रार करणार नाहीं. छे, तक्रार करून तुम्हांला—माझ्या मित्रांना शासन करण्याची खटपट करूं मी? तें शक्य नाहीं! तुमच्यांतला आणि माझ्यांतला—हिंदुमुसलमानांतला—हा तुटलेला धागा सांधण्यासाठीं मी माझ्या प्राणाचाही बळी देण्यास तयार होईन, मग ह्या घराची काय पर्वा! चल महंमद ....

[ जाऊं लागतो.

**रघुवीर :** रहीम .... रहीम .... जरा थांब ...

**बन्सी :** महंमद, थांब ना .... महंमद .... !

[ महंमद आणि बन्सी एकमेकांकडे अश्रुपूर्ण दृष्टीनें पाहातात.

**गिरिधर :** ( बन्सीला ओढून ) मागें हट, कार्ट्या, नाहींतर ....

**प्रभाकर :** अरे, जाऊं दे त्यांना. त्यांच्याशीं असंच वागलं पाहिजे.

रहीम पुढें आणि महंमद मागें जड पावलांनीं आंत जातात. रघुवीर भांबावलेल्या दृष्टीनें त्यांच्याकडे पाहात आहे. गिरिधरच्या चेहेऱ्यावर सूडाच्या पूर्तीचें हास्य आहे. बन्सी हुंदके देत हातांनीं तोंड मिटून घेतो.

प ड दा

म. ...
दा. क. ...
दि. ...

# ३

महात्माजींची हत्या होऊन दोन-तीन दिवस झाले आहेत.
सर्वत्र दुःखाचें आणि भीतीचें वातावरण पसरलें आहे.
दूर कोठें तरी भजन चालू आहे

**रघुपति राघव राजाराम, पतित पावन सीताराम**
**ईश्वर अल्ला तेरे नाम, सबको सन्मति दे भगवान् !**

पडदा उघडतो

[ रहीम आणि महंमद शेतावरील आपल्या झोपडींत बोलत बसले आहेत.

**रहीम** ( दुःखावेगानें ) आमचा त्राता गेला ! ह्या दुर्दैवी भारताचा एकुलता एक पालनकर्ता गेला ! महात्मा गांधींची हत्या ज्या माथेफिरूनीं केली त्यांनीं स्वतःबरोबर आपल्या देशाचाही नाश केला !

**महंमद :** काका, गांधींना कुणीं मारलं हो ? गांधीबाबा किती चांगले होते ! आमच्या गांवीं ते आले होते तेव्हां आम्हीं सर्वांनीं त्यांच्या पायांची धूळ कपाळाला लावली !

**रहीम :** होय बेटा, असा थोर मनुष्य पुन्हा होणार नाहीं. गांधीबाबा अल्लाचे खरे सेवक होते. ह्या देशाला आणि आमच्यासारख्या अडाणी बालकांना त्यांनीं धुळींतून वर उचललं! ह्या देशाला सोन्याचे दिवस त्यांनींच आणले असते. जनतेचं खरंखुरं रामराज्य त्यांनीं स्थापन केलं असतं. आतां ह्यापुढें ह्या देशावर मतलबी शेठसावकारांचं राज्य ....

[ हुकूमशेठ प्रवेश करतो.

१७००९

**हुकूमशेठ :** केम करीम, ठीक छे? अरे असा सुतकी चेहेरा करून काय बसेल? तुमचा बापबीप मेले काय?

**रहीम :** या, या, हुकूमशेठ, आज .... आमचे वडील वारले, दोन दिवस झाले.

**हुकूमशेठ :** काय? तुमचा बाप मेले? अरा–रा–रा–रा! फार खराब गोष्ट जाला!

**रहीम :** महात्मा गांधी आम्हां सर्वांचे वडीलच होते. त्यांच्यामागें आम्ही आतां पोरके झालों!

**हुकूमशेठ :** ऑऽ अरे! असा बोलते होय! अरे, गांधीला कुणीं खुळा माणसानें मारला, तो मेला! आतां काय तेचा? बरा, तुझा सेत विकणार होता, तेचा काय झाले?

**महंमद :** काका, शेत कां हो विकतां? मग आपण राहायचं कुठें?

**रहीम :** शेठजी, मी शेत विकणार आहें खरं. आतां मला इथें राहावं असं वाटतही नाहीं. पण मेहेरबानी करून आज सौद्याची भाषा

नको. गांधीजींना मरून दोनच दिवस झाले, आणखी पंधरा दिवसांनीं या तुम्ही.

**हुकूमशेठ :** अरे, त्येचा इतका दुख काय करते? गांधीला मारला ते लोकाला चांगला प्रायश्चित्त मिळाला! आतां त्येचा सुतक कसला करते? तुझा गावचाबी समदा ब्राह्मण लोक खलास ....

**रहीम :** म्हणजे?

**महंमद :** आमचा बन्सी चांगला आहे ना?

**हुकूमशेठ :** मी आतां तिकडूनच आले. एकूण एक घर जळाला! तुझा घर बी जळाला!

**महंमद :** आमचं घर? आमचं घर कसं जळालं?

**हुकूमशेठ :** तेचा असा झाला, रहीमचा घर प्रभाकराच्या घरालगत होता. तो पहिला लोकांनीं जाळला ....

**रहीम :** काय? प्रभाकरचं घर जाळलं लोकांनीं?

**हुकूमशेठ :** हां, हां, समदा खल्लास!

**रहीम :** आणि रघुवीर?

**हुकूमशेठ :** समदा खल्लास!

**रहीम :** अरे, अरे, ही गोष्ट फार वाईट झाली! लोकांच्या ह्या दुष्ट सैतानी वृत्तीला काय म्हणावं? माझं घर .... माझं ऐक्यमंदिर जळालं



हुकूमशेठ

त्याचं नाहीं मला दुःख होत. पण लोकांच्या सूडबुद्धीच्या ह्या हीन वृत्तीनें माझ्या ऐक्यमंदिराचा आत्माच जळाला !

( पड्यांत – “ रहीम – रहीम ...ऽ )

**रहीम :** कोण ? कोण ? रघुवीर ? प्रभाकर ? या या, मित्रांनो, मी तुमचं स्वागत करतों !

**प्रभाकर :** रहीम, आम्हांला आश्रय दे. आमच्या जिवावर प्रसंग आहे. आम्ही तुझ्यावर फार अपकार केले, पण ह्या वेळीं तूं आम्हांला आसरा दे ....

**रहीम :** प्रभाकर, रघुवीर, घाबरूं नका. ही झोपडी तुमचीच आहे. इथें खुशाल राहा तुम्ही. तुमच्या केसालाही धक्का लागण्यापूर्वीं प्रथम मी माझा प्राण देईन.

**रघुवीर :** रहीम, किती थोर मन आहे तुझं ! तुला आम्हीं निर्वासित केलं, तुझ्या स्वतःच्या घरांतून तुला आम्हीं हाकून दिलं, पण तोच प्रसंग आमच्यावर आल्यावर तूं इतक्या मोठ्या मनानें धीर देतोस ! खरोखर आमच्या पूर्वींच्या कर्माबद्दल आम्हांला लाज वाटते रे !

[ हातांनीं तोंड झाकून घेतो.

**रहीम :** रघुवीर, रघुवीर ....

**प्रभाकर :** तुला आठवतो का तो प्रसंग ? मीच तुला कठोर वाणीनं बोललों होतों, ‘ आपल्या जातभाईंच्या अपराधाबद्दल प्रत्येकानें शासन भोगलं पाहिजे !’ रहीम, माझं वाक्य आज समाजानें मला खरं करून दाखवलं !

**रहीम :** आतां त्याची भाषा काढूं नकोस !

**प्रभाकर :** ( दुःखानें तोंड लपवीत ) माझ्या जातभाईंच्या घोर अपराधाबद्दल मला शासन मिळालं रहीम ....

**रहीम :** थांब, प्रभाकर आतां बोलूं नकोस तें. ( हुकूमशेठकडे वळून ) हं, शेठ, आपणाला ही माझी जमीन विकत घ्यायची आहे ना ?

**रघुवीर :** काय ? शेत विकणार तूं ?

**प्रभाकर :** मग राहाणार कुठें ? आणि ....

**रहीम :** तें पाहूं मग. शेठजी, बोला, आत्तां रक्कम द्यायला तयार आहांत ?

**हुकूमशेठ :** हा, हा, जरूर. ह्या घटकेस देते. चल, ठरला आठ हजार रुपिया ?

**रहीम :** शेठजी, तुम्ही दहा हजार म्हणाला होतां ना ?

**हुकूमशेठ :** तेला झाला महिना. आतां जमिनीचा भाव फार उतरला. तुला म्हणून चल, आम्ही नऊ हजार देते. काय ? नाहीं ? बरं, हे घे पंचवीस रुपये जास्त. बरा हे साडेनऊ हजार ? नाय ? बरा, तुझा मर्जी ! आम्ही जाते.

**रहीम :** शेठ, दहा हजार झाले तर ठेवा आत्तां, नाहींतर वाट सुधारा.

**हुकूमशेठ :** अच्छा, हे घे. दहा तो दहा हजार. चुकती पावती दे. उद्यां खरेदीपत्र रजिष्टर करून टाकूं.

[ नोटा मोजून देतो व पावती घेतो.

**हुकूमशेठ :** अच्छा, भाई प्रभाकर, रघुवीर, लागला पैसा तर आम्ही भरपूर व्याजावर देते हा! आम्ही कोळसाबी खरेदी करते हा!

[ हसत व डोळे मिचकावीत जातो.

**प्रभाकर :** रहीम, काय केलंस हें? तुझी ही जागा, एकुलती एक निवाऱ्याची होती, तीही तूं विकून टाकलीस! आतां आपण राहायचं कुठें?

**रघुवीर :** रहीम, तुझं घरही जळून गेलं. आमची तर राखरांगोळी झाली! आणि तो हरामखोर हुकूमशेठ कोळसे विकत घेतों म्हणतोय्! आमच्या दुःखावर डागण्या देतो आहे. रहीम, आतां मात्र आम्ही अक्षरशः निर्वासित झालों!

**रहीम :** नाहीं, प्रभाकर, रघुवीर, तुम्ही निर्वासित होऊं शकणार नाहीं. तुम्ही आपलीं घरं पुन्हा नवीन बांधा.

**प्रभाकर :** पण कशानें पुन्हा घरं बांधायचीं? एक दमडीही नाहीं आमच्यापाशीं! जें होतं नव्हतं तें अग्निनारायणानें भक्षण केलं!

**रहीम :** हे आहेत ना दहा हजार रुपये? हे घ्या. चला, नाहीं म्हणूं नका. माझी शपथ आहे तुम्हांला!

[ गिरिधर आणि बन्सी प्रवेश करतो.

**गिरिधर :** रहीम, रहीम! क्षमा कर मला. तुला निर्वासित करायला मी कारण झालों. मींच खोट्यानाट्या आणि तिखटमीठ लावून आमच्या हालांच्या गोष्टी सांगून ह्यांचीं डोकीं भडकवून दिलीं. आतां देवानेंच मला

प्रायश्चित्त दिलं ! माझं सर्वस्व जळून गेलं ! मी कंगाल आणि पुन्हा निर्वासित झालों !

**बन्सी :** पण बाबा, महंमद मला पुन्हा भेटला ! आपण राहूं या ना पुन्हा सगळे जवळ जवळ.

**रहीम :** बन्सी, गिरिधर, माझ्या मित्रांनो, प्रभाकर, रघुवीर, तुम्हांला निर्वासित होण्याचं कारण नाहीं. प्रभाकर, तूं आपलं घर पुन्हा चांगलं बांध. त्याला ' ऐक्य-मंदिर ' असंच नांव दे आणि तिथें तुम्ही सगळे सुखानें राहा. अल्लाच्या कृपेनें मी आतां यात्रेस जाईन.

**बन्सी :** पण महंमद राहूं दे ना आमच्याजवळ ?

**महंमद :** काका, मी राहूं इथें ?

**प्रभाकर :** नाहीं, नुसता महंमद नाहीं रहीम, तूंही राहा आमच्याजवळ. आतां राम आणि रहीम ह्यांची ताटातूट मी होऊं देणार नाहीं. त्या दिव्य आणि अग्नींतून पावन झालेल्या ' ऐक्य-मंदिरांत ' आपण सगळेच जण भाऊ भाऊ म्हणून राहूं या ! हिंदुमुसलमानांच्या ऐक्याचं महात्मा गांधींचं स्वप्न आपण कृतीनें खरं करूं या आणि जगाला तें दाखवूं या !

**रहीम :** ठीक आहे, जशी तुमची इच्छा. रामाजवळ हा रहीम नेहमींच उभा राहील ! आपल्या ऐक्यानेंच ह्या भारतभूला आपण पुन्हा सोन्याचे दिवस आणूं. चला, ह्या पवित्र वेळीं आपण आपल्या परमपवित्र मायभूमीचं स्मरण करूं या.

सर्व :

( भैरवी – त्रिताल )

( चाल : हे माधवा, मधुसूदना )

हे मातृभू प्रिय देवते !
त्वत्प्रीति-गंगा अनंत अविनाशी
या हृदयांतुनी वाहते,
प्रिय देवते !

तव पायिं वाहूं निजदेहसुमनें,
त्वन्नाम उजळूं प्राणाहुतीनें
प्रिय पुत्र-कन्या तव भूषिते –
होऊं तरी सार्थ जन्मीं हे, माते,
प्रिय देवते !

BVBK-0404542

स मा प्त

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्र. ७०००
दि. ९/८/८४
क्रमांक
नों. दि. ८/१७/८४
ग्रंथालय शाखा.
७५८६
दि. ५।:९।.